लोकमत

फॉन्टफ्रीडम मायबोली

Expert Astrology Consultant
Expert astrology predictions. Click to know more about your future.
www.manyzone.com

# आवडते क्षेत्रच करियरसाठी निवडा- प्रा. नवले

(१०-०६-२००८ : १२:४६:४३)

अहमदनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- आपल्याला कोणते क्षेत्र आवडते व त्या क्षेत्राला सामोरे जाण्याची आपल्यात काय क्षमता आहे हे पाहून करियरचे क्षेत्र ठरवा. एकदा क्षेत्र ठरविले की त्यात सर्वोत्तम होण्याचा प्रयत्न करा. करियरसाठी कोणतेही क्षेत्र वर्ज्य नाही, असे प्रतिपादन प्रा. विजय नवले यांनी काल केले.

'लोकमत युवा मंच' व 'मिड्स मुंबई' यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी, बारावी तसेच पदवीधरांसाठी 'करियरच्या संधी' या विषयावर रविवारी प्रा. नवले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सहकार सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला तरूणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. करियरच्या अनेक क्षेत्रांची ओळख तरूणाईला झाली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोंडीराम नागरगोजे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. 'मिड्स' संस्थेचे प्रा. बबनराव दिघे, सक्सेना, रणजित तोरडमल, प्रा. श्रीकांत सोनटक्के तसेच 'लोकमत'चे शाखा व्यवस्थापक प्रवीण ससाणे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात नागरगोजे यांनी मुलांना त्यांचे करियरचे क्षेत्र ठरवू द्या असे आवाहन पालकांना केले. बऱ्याचदा मुलांनी कोणत्या क्षेत्रात करियर करायचे हे पालकच ठरवितात. त्यामुळे स्वत:ला रुची नसलेले क्षेत्र मुलांना निवडावे लागते. हे थांबायला हवे असे ते म्हणाले. कार्यक्रमात 'मिड्स' संस्थेचे सक्सेना यांनी 'अॅनिमेशन' क्षेत्राबद्दल माहिती सांगितली. प्रारंभी ससाणे यांनी प्रास्ताविक केले. वरिष्ठ उपसंपादक सुधीर लंके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. विराज मुनोत व स्नेहा शेळके यांनी सूत्रसंचालन केले, युवा मंचचे संयोजक धनेश खत्ती यांनी आभारप्रदर्शन केले.

या बातमी वरील वाचकांच्या प्रतिक्रिया

ही बातमी प्रिंट करा ही बातमी मित्राला इ-मेल करा आपली प्रतिक्रिया

Archives | About Us | Feedback | Contact
Copyright : Lokmat Newspapers Ltd - 2007
Developed, Hosted and Maintained by
MasterMind Technologies, Mumbai

लोकमत

News Static Page Generated on:10-6-2008 at 3:4